जा.क्रं.पोउआ/वि.शा./**सुरक्षा**/संरक्षण/ ९६०४/२०२३
पोलीस उप- आयुक्त, विशेष शाखा- १, पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक -१५ /०९/२०२३

**विषय - प्रखर लाईट (बीम लाईट) बाबत फौजदारी प्रक्रिया संहिता सन-१९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधक आदेश.**

**आदेश,**

लोहगाव टेक्नीकल विमानतळ व नागरी विमानतळ, पुणे शहर येथे दिवसा व रात्रौ वेगवेगळ्या एअर लाईन्सची व भारतीय वायु सेनेचे विमाने व हेलिकॉप्टर उतरत असतात व उड्डाण करीत असतात. रात्रीचे वेळी वैमानिकांना दिशा व ठिकाण दाखविण्यासाठी रनवे वर व एटीसी टॉवरकडून संकेतासाठी लाईटचा उपयोग करण्यात येतो.

ज्याअर्थी भारतीय वायुसेनांनी असे निदर्शनास आणुन दिले आहे की, लोहगाव विमानतळाचे वायुक्षेत्राचे (Air Field) जवळच्या परिसरात विविध कार्यक्रमाच्या वेळेस आकाशामध्ये प्रखर लाईट बीम (Light Beam)चा उपयोग करण्यात येतो.

माझी अशी खात्री पटली आहे की, अशा प्रखर लाईट बीममुळे वैमानिकाचे डोळे दिपून दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग-१, मध्य उप-विभाग यांचेकडील अधिसुचना क्र.३ मधील पान क्र.४ मधील क्रिमिनल प्रोसिजर कोड नं.१९७३ चा क्र.एमएससी. १२७४/व्ही-एफ मधील आदेशाने सीआरपीसी १९७३ (II-१९७४) चे कलम २१ अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्त करुन कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी मी, **संदिप कर्णिक, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर**, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की,

लोहगाव वायुसेना व नागरी विमानतळाच्या साधारणपणे १५ कि.मी. अंतराच्या वायुक्षेत्र (Air Field) परिघामध्ये (Radius) पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात सायंकाळी १८.०० ते सकाळी ०६.०० वा. पर्यंत खालील कृत्यांवर प्रतिबंध करण्यात येत आहे.

कोणत्याही माणसाने किंवा कार्यक्रम आयोजकांनी प्रखर लाईट बीम आकाशात सोडू नये. सदरचा आदेश **दिनांक -१५ /०९/२०२३** रोजी पासून दोन महिन्यासाठी अंमलात राहील.

सदरच्या आदेशांचे उल्लंघन करणारी व्यक्ती भादवि कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. सदरचा आदेश मी, माझ्या सहीनिशी आज **दिनांक -१५ /०९/२०२३** रोजी दिला आहे.

**ठिकाण - पुणे शहर,**
**दिनांक :-** १५/०९/२०२३

(संदिप कर्णिक)
पोलीस सह.आयुक्त,पुणे शहर तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक तथा
विशेष कार्यकारी दंडाधिकारी
(खास अधिकार प्रदान केलेले)

14.12/9/23

प्रत सादर,

१. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, म.रा.मुंबई
२. पोलीस महासंचालक, म.राज्य,मुंबई
३. अपर मुख्य सचिव,गृह विभाग (गृह) म.रा.मुंबई
४. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग,म.रा.मुंबई
५. पोलीस आयुक्त, पुणे शहर

प्रत सस्नेह अग्रेषितः-

१. विभागीय आयुक्त, पुणे विभाग
२. आयुक्त, पुणे/ पिंपरी चिंचवड म.न.पा. पुणे
३. जिल्हा सत्र न्यायाधीश, पुणे

प्रत,

१. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, प्रशासन, उत्तर व दक्षिण विभाग, पुणे शहर
२. सर्व पोलीस उप- आयुक्त, पुणे शहर
३. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे
२/- या आदेशाची स्थानिक वृत्तपत्रातुन प्रसिध्दी करावी.
४. सहा.पोलीस आयुक्त/वरिष्ठ पोलीस अभियोक्ता/सर्व पोलीस निरीक्षक,पुणे शहर

पोलीस आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व वाहतुक शाखेतील सर्व पोलीस निरीक्षक यांनी आपआपले हद्दीमध्ये या आदेशाची जास्तीत जास्त प्रसिद्धी होण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे किंवा अन्य मार्गाने महत्वाचे चौकात पोलीस चौकीच्या भिंतीवर सर्वाच्या दृष्टीक्षेपात येईल अशा रितीने चिकटवुन प्रसिध्दी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा.